
दुर्गदेखणा
श्री
गड गणेश
प्रसाद पवार

लेखन - पसाद पवार , पुणे.

8888801248

prasad.pawar@timesgroup.com

प्रकाशन - ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ , मांडणी आणि सजावट : सचिन काकडे

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

© esahity Pratishthan®2015

# दुर्गमदेखणा गडगणेश

गणरायाच्या आगमनाची चाहूलच वातावरण एक प्रसन्नता निर्माण करून जाते. बाप्पाची विविध रूपं डोळ्यांत साठवताना एक वेगळंच समाधान मिळतं. बाप्पाचं अस्तित्व जितकं सुखवणारं तितकंच आश्वस्त करणारंही आहे. याचा अनुभव सह्याद्रीच्या दुर्गम दऱ्याखोऱ्या आणि गडकोटांची भ्रमंती करताना येतो. भटकून दमल्यावर अचानक दुर्गम ठिकाणचा देखणा बाप्पा आपल्यासमोर येतो आणि आपण नकळत नतमस्तक होतो. सह्याद्रीतल्या प्रत्येक गडावर बाप्पाचं अस्तित्व आहेच. दुर्गम गडकोटांसह लेणी तसंच गडद-गुहांमध्येही बाप्पा विसावलेला आहे. पुण्याच्या परिसरातल्या गडकोटांबाबत बोलायचं झालं, तर सिंहगडाच्या घाटातला गणेश, राजगडाच्या सुवेळा माचीवरचा प्राचीन गणेश, पर्वतगडावरच्या शिवमंदिरातील देखणा गणेश, प्रसन्नगडाच्या महाद्वारपट्टीवरचा कोरीव बाप्पा, कोराईगडाच्या वाटेवरचे शेंदूरचर्चित गणराय, रोहिड्यावरील गणरायांचं प्राचीन रूप, राजमाचीवरचा कोनाड्यातला बाप्पा त्याशिवाय रायगडाच्या गंगासागरात मिळालेली गणरायाची मूर्ती, प्रतापगडावरील श्रीभवानीमातेच्या मंदिरातील गणेश, हरिश्चंद्रगडावरच्या गणेश गुहेतलं बाप्पाचं भव्य रूप, सिंदोळ्यावरचे अवचित समोरे येणारे गणराय अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. सह्याद्रीतल्या गडांनुसार बाप्पाच्या रूपातही वैविध्य आढळतं. काही ठिकाणी तो महाद्वारांच्या द्वारपट्टीवर दर्शन देतो, तर काही ठिकाणी

गडावरील प्रत्येक मंदिरात त्याची प्राचीन मूर्ती दिसते. काही ठिकाणी तटबंदीतल्या कोनाड्यात गणराय विराजमान झालेले दिसतात, तर अनेक गडांवर बाप्पाचं स्वतंत्र मंदिरही असतं. विशेषतः कोकणातल्या अनेक गडांवर बाप्पाची स्वतंत्र मंदिरं आढळून येतात. जयगड, मंडणगड येथील मंदिरांमध्ये गणरायाची वेगवेगळी रूपं दिसून येतात. श्रीबागजवळच्या कुलाबा या जलदुर्गातलं गणेश पंचायतनही सुंदर आहे. महाराष्ट्र आणि गोवा यांच्या सीमेवरील पारगडावरही गणरायाची वेगळी मूर्ती आहे. मुखवटा स्वरूपातील या मूर्तीच्या चेहेऱ्याचा भाग इतर मूर्तीपेक्षा मोठा आहे. त्या-त्या प्रदेशातील श्रद्धा, चालीरिती आणि परिस्थितीनुसार जसं उत्सवाचं स्वरूप बदलताना दिसतं, तसंच गडावरील गणरायाच्या मूर्तींमध्ये असणारे बदलही आपल्या लक्षात येतात. अनेक गडांवर गणरायाच्या भग्न मूर्तीही आहेत. भग्न असल्या, तरी त्यांच्या भव्यतेमुळे त्या लक्षात राहतात. साताऱ्याजवळच्या संतोषगडावरील गणरायाची मूर्ती म्हणूनच लक्षात राहाते. तिथल्याच वारुगडावर भक्तांनी स्थापन केलेला संगमरवरी गणेशही मनाचा ठाव घेतो. इथली जुनी मूर्ती कशी असेल, हा प्रश्नही पडतो. गडांवर फिरताना काही अख्यायिकाही कानी पडतात. त्यातले धागे वर्तमानाशी आपलं मन कुठेतरी जोडू पाहातं. म्हणूनच यंदाच्या गणेशोत्सवात वेळ काढून दुर्गम जागी वसलेल्या यातल्या एका बाप्पाचं तरी दर्शन आवर्जून घ्या. एका दिवसाचा वेळ हाताशी ठेवून तुम्ही या गडांना भेट देऊ शकता.

# हरिश्चंद्रगडावरचा लंबोदर



पुणे, नगर आणि ठाणे अशा तीन जिल्ह्यांच्या हद्दीवर वैशिष्ट्यपूर्ण स्थानी असणाऱ्या या गडावर बाप्पाची प्राचीन रूपं पाहाता येतात. त्यापैकी गणेशगुहेतील बाप्पाचं भव्य रूप डोळ्यांत साठवावं असं. अनेक पौराणिक कथांशी हरिश्चंद्रगडाचा इतिहास जोडलेला असल्यानं बाप्पाचं हे शिल्प हजारो वर्षांचा इतिहास जपून आहे. या बाप्पाच्या आकारावरून त्याचं लंबोदर हे नाव सार्थ ठरतं. शेंदूरचर्चित शिल्पाच्या मागील दोन्ही हातांमध्ये शस्त्र आहेत. पुढील उजवा हात आणि पाय थोडा भग्न असून डाव्या हाती प्रसाद आहे. डाव्या पायावर स्वस्तिक कोरलेलं आहे. हरिश्चंद्रगडाच्या भ्रमंतीत बाप्पांचं हे देखणं रूप चित्तावर ठसा उमटवून जातं.

# पर्वतगडावरील देखणा गणेश



जुन्नर तालुका हा ऐतिहासिक आणि पौराणिक स्थळांचा खजिना. जुन्नरपासून अवघ्या बारा किलोमीटरवर असणाऱ्या हडसर उर्फ पर्वतगडावरील देखण्या बाप्पाचं दर्शन आवर्जून घ्यायला हवं. गडावरील भगवान शंकरांच्या मंदिरात गणरायाची ही देखणी मूर्ती विराजमान झालेली आहे. चतुर्भुज, शेंदूरचर्चित गणरायांच्या मागील दोन्ही हातांत परशू आहे. चारही हात आणि पायांमध्ये माळा आहेत. मुकुटावरही माळेची नक्षी आणि नागाचा फणा कोरण्यात आला आहे. गडाची कातळकोरीव वाट आणि बाप्पांचं इथे घडणारे दर्शन सुखावून जाते.

# कोराईगडाच्या कुशीतला बाप्पा

लोणावळ्याजवळचा कोराईगड परिसर पुणे-मुंबईकरांचा अत्यंत आवडता आहे. कित्येक शतकांचा इतिहास लाभलेल्या या गडाच्या कुशीतल्या लेण्यांमध्ये बाप्पाचं देखणं रूप वसलं आहे. पेठ शहापूर गावातून मळलेल्या पायवाटेनं गडावर जाताना गडाच्या निम्म्या टप्प्यावर असणाऱ्या लेणीतलं बाप्पाचं दर्शन सुखावते. डोक्यावरील मुकुट, मागील दोन्ही हातातील परशू, प्रसन्न मुद्रा, उजवा हात आशीर्वचनी तर डाव्या हाती प्रसाद, असं हे सुंदर गणेशरूप कोरीव कमानीत विराजमान आहे.



# रोहिड्यावरील प्राचीन रूप



भोरजवळचा रोहिडा हा विचित्रगड म्हणूनही परिचित आहे. गडावरील रोहिडमल्लाच्या मंदिरात बाप्पाचं प्राचीन रूप पाहाण्यास मिळतं. या मंदिराचा दुर्गप्रेमींनी जीर्णोद्धार केला आहे. हे मंदिर अनेक वर्षे पडिक अवस्थेत असल्यानं उन-वारा-पावसानं बाप्पांच्या मूर्तीची झीज झालेली आहे. त्यातही बाप्पांचं प्राचीनत्व लक्षात येते. मूर्ती चतुर्भुज असून पोटावर नागाचा वेढा आहे. बाप्पांच्या सोंडेनं प्रसादाऐवजी हातातल्या शस्त्राला वेढा दिला असून, हेच या मूर्तीचं वेगळेपण आहे. ही मूर्ती काही वर्षांपूर्वी गडावरील तलावात मिळाल्याचं सांगितलं जातं.

# घाटातला गणेश

सिंहगडाच्या घाटात अकरा हजाराचा टप्पा म्हणून जे वळण ओळखलं जातं, तिथे एका झाडाखाली असणारी वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती लक्ष वेधून घेते. ही मूर्ती झाडाखाली कशी आणि केव्हा आली माहिती नाही पण तिथं तिची पूजा-अर्चाही होते. गणरायाच्या हातातील शस्त्रं, गळ्यातली माळ ओळखू येते. घाटरस्त्यानं गडावर जाताना अवचित येणारा उदबत्तीचा सुगंध आणि गणेशदर्शन मनाला सुखावून जातं. विशेष म्हणजे गणरायाची ही मूर्ती दहा दिवस गडावरील पार्किंगमध्ये विधीवत पूजली जाते आणि गणेशोत्सवानंतर पुन्हा ती या झाडाखाली आणली जाते. अशी माहिती कैलास जरांडे यांनी दिली.

## राजगड, सुवेळा



## कुलाबा किल्ला



दऱ्याखोऱ्यांत भटकताना, एखाद्या दुर्गम गडाची खडी चढण पार केल्यावर, कधी कातळकड्यात, महाद्वाराच्या द्वारपट्टीवर, तर कधी गडावरील मंदिरात बाप्पाचं देखणं रूप दर्शन देतं आणि नकळत आपण नतमस्तक होतो. सह्यकड्यात विसावलेली बाप्पाची विविध रूपंही तितकीच मनोहारी. यंदाच्या गणेशोत्सवात यातल्या एखाद्या तरी बाप्पाला भेट द्या.

# ई साहित्य प्रतिष्ठान

कुठलीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. आपली भाषा ती आपली भाषा. जशी दोन मातांची तुलना करता येत नाही तशी दोन मातृभाषांचीही करू नये. आपण आपली भाषा समृद्ध करण्यासाठी काय करता येईल ते करावे. बस्स.

तर तसे अनेक चांगले मराठी लोक चांगलं काही करायचा प्रयत्न करत असतात. काही चांगले लोक चांगलं मराठी लिहायचा प्रयत्न करत असतात. आणि हे चांगलं जास्तीत जास्त मराठी लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आम्ही करतो. दर महिन्याला डझन अर्धा डझन पुस्तकं प्रकाशित करतो. ती सुमारे तीन लाख  वाचकांपर्यंत पोहोचवतो. आजवर हजाराच्या घरात पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

यावर खुष व्हावं. अजिबात नाही.

बारा कोटी लोकांची भाषा मराठी. त्यातले निदान सहा कोटी साक्षर.

आणि वाचक किती? तीन लाख?

बहुत नाइन्साफ़ी है.

मराठीतला प्रत्येक साक्षर वाचक व्हायला हवा. मोबाईलचा वाढता प्रसार आणि इंटरनेटचा वाढता व्याप पहाता, हे शक्य आहे. होय. हे शक्य आहे.

मराठी ई बुक्स चे वाचक कोटीच्या संख्येत असायला हवेत.

हे कोण करणार?

तुम्ही!

तुतुम्ही आपल्या ओळखीच्या  किमान दहा लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. त्यांना वाचक बनवण्यासाठी आम्ही जंग जंग पछाडू. ते शंभर लोकांना वाचक बनवतील. लाखांचे कोटी व्हायला कितीसा वेळ लागणार**?**

सर्व प्रकारच्या वाचकांसाठी आम्ही पुस्तकं बनवतो. बालसाहित्यापासून ते गूढ कथांपर्यंत आणि ज्ञानदेव तुकारामांच्या संत साहित्यापासून ते अगदी कामसूत्रापर्यंत. प्रत्येक तऱ्हेच्या वयाच्या, निवडीच्या, आवडीच्या वाचकासाठी आम्ही पुस्तकं बनवतो आहोत. अगदी कृषी आणि रेसिपी सुद्धा.

मित्रांनो. या अभिनव अभियानात सामिल व्हा.
दहा लोकांना वाचक बनवा.
दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही **VIP** वाचक दर्जा देतो. .

आमचा पत्ता  :esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या  :www.esahity.com

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान